वाचले -

१. मा. स्थायी समिती ठराव क्र. ११७७६ दि. १६/०६/२०१५
२. शासन निर्णय क्र. प्रानिमं१२१४/प्र.क्र.(४३/१४)/१३-अ. दि. ०५/०६/२०१४.
३. दि. ०७/०७/२०१५ रोजीची निवड यादी
४. मा. आयुक्त यांचेकडील दि. १४ /०७/२०१५ चा मान्य प्रस्ताव.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - १८.
वैद्यकिय विभाग मुख्य कार्यालय
क्र. वैद्य/०१/कावि/११२८/२०१५.
दि. २० / ७ /२०१५.

**विषय - विविध टेक्निशियन व पॅरामेडीकल' संवर्गातील पदे दरमहा एकत्रित मानधनावर हंगामी स्वरुपात सहा महिन्याचे कालावधीसाठी तात्पुरत्या स्वरुपाच्या नियुक्तीबाबत.**

आदेश,

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे विविध दवाखाना / रुग्णालयात विविध अभिनामाची पदे एकत्रित मानधनावर ६ महिने कालावधीसाठी भरणेकामी मा. स्थायी समीती ठराव क्र. ११७७६ दि. १६/०६/२०१५ अन्वये मान्यता घेऊन दि. २७/०६/२०१५ व दि. २८/०६/२०१५ रोजी सदर पदांची जाहिरातीनुसार व शासन निर्णयानुसार उमेदवारांच्या लेखी परीक्षा घेण्यात आलेल्या आहेत. लेखी परीक्षेमधून गुणानुक्रमे व आरक्षणानुसार उमेदवारांची निवड यादी मनपाचे वेबसाईटवर दि. ०७/०७/२०१५ रोजी प्रसिध्द केली आहे. त्याप्रमाणे खाली नमुद केलेल्या उमेदवारांना शैक्षणिक अर्हता धारण केलेनंतरचा अनुभव कालावधी विचारात घेऊन त्यांचे नावापुढे नमुद केलेल्या एकत्रित मानधनावर विविध दवाखाना / रुग्णालयात खालील अटी व शर्तीचे अधीन नमूद ६ महिने कालावधीकरीता पुर्णतः तात्पुरत्या स्वरुपात नेमणूक देणेत येत आहे.

| अ. क्र. | उमेदवाराचे नाव | नियुक्तीचे पदनाम | प्रवर्ग | प्रतिमाह एकत्रित मानधन र.रु. | कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| १ | श्री. संगावर शिवराज किशनराव | फार्मासिस्ट | खुला | १२०००/- | दि. ०३/०८/२०१५ ते दि.०२/०२/२०१६ |
| २. | श्रीम. पौळ प्रमोदीनी जगदीश | फार्मासिस्ट | खुला (अनू.जाती) | १२०००/- | दि. ०३/०८/२०१५ ते दि.०२/०२/२०१६ |
| ३. | श्री. लुणावत धीरजकुमार संपतलाल | फार्मासिस्ट | खुला | १२०००/- | दि. ०३/०८/२०१५ ते दि.०२/०२/२०१६ |
| ४. | श्रीम. चौगुले सुषमा सुभाष | फार्मासिस्ट | खुला (भ.ज.(क) | ११४९०/- | दि. ०३/०८/२०१५ ते दि.०२/०२/२०१६ |
| ५. | श्री. खेडकर संदिपान तुकाराम | फार्मासिस्ट | खुला | ११४९०/- | दि. ०३/०८/२०१५ ते दि.०२/०२/२०१६ |
| ६. | श्री.पवार साईनाथ नवनाथ | फार्मासिस्ट | खुला | १२०००/- | दि. ०३/०८/२०१५ ते दि.०२/०२/२०१६ |
| ७. | श्रीम. अडसुळे रत्नप्रिया दत्ता | फार्मासिस्ट | खुला( अनु.जाती) | १४०००/- | दि. ०३/०८/२०१५ ते दि.०२/०२/२०१६ |
| ८. | श्रीम. लावंघरे शिल्पा कल्पेश | फार्मासिस्ट | खुला | १४०००/- | दि. ०३/०८/२०१५ ते दि.०२/०२/२०१६ |
| ९. | श्रीम. लोखंडे सोनाली दादासाहेब | फार्मासिस्ट | अनु.जाती | १२०००/- | दि. ०३/०८/२०१५ ते दि.०२/०२/२०१६ |
| १०. | श्रीम. सुर्यवंशी ज्योती ज्ञानेश्वर | फार्मासिस्ट | अनु.जाती | १४०००/- | दि. ०३/०८/२०१५ ते दि.०२/०२/२०१६ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ११. | श्रीम. गवारी प्रज्ञा बाळासाहेब | फार्मासिस्ट | अनु.जमाती | ११४९०/- | दि. ०३/०८/२०१५ ते दि.०२/०२/२०१६ |
| १२. | श्रीम. रोडे सायली चंद्रकांत | फार्मासिस्ट | विजा-अ | १२०००/- | दि. ०३/०८/२०१५ ते दि.०२/०२/२०१६ |
| १३. | श्रीम. आसवले रुपाली हरिभाऊ | फार्मासिस्ट | भ.ज.(क) | १४०००/- | दि. ०३/०८/२०१५ ते दि.०२/०२/२०१६ |
| १४. | श्रीम. जंगम विजया प्रकाश | फार्मासिस्ट | इ.मा.व. | ११४९०/- | दि. ०३/०८/२०१५ ते दि.०२/०२/२०१६ |
| १५. | श्री. फल्ले नवनाथ शिवदास | फार्मासिस्ट | इ.मा.व. | ११४९०/- | दि. ०३/०८/२०१५ ते दि.०२/०२/२०१६ |
| १६. | श्रीम. सोनुने मनिषा रुस्तुमराव | फार्मासिस्ट | इ.मा.व. | १४०००/- | दि. ०३/०८/२०१५ ते दि.०२/०२/२०१६ |
| १७. | श्रीम. अमृतकर वृषाली प्रशांत | लॅब टेक्निशियन | खुला | १७०००/- | दि. २४/०८/२०१५ ते दि.२३/०२/२०१६ |
| १८. | श्रीम.पवार संगीता रमेश | लॅब टेक्निशियन | खुला | १२०००/- | दि. २४/०८/२०१५ ते दि.२३/०२/२०१६ |
| १९. | श्री. ढोके चारुदत्त वसंतराव | लॅब टेक्निशियन | अनु.जाती | १७०००/- | दि. २४/०८/२०१५ ते दि.२३/०२/२०१६ |
| २०. | श्रीम. दिघे शुभांगी दत्तात्रय | लॅब टेक्निशियन | अनु.जमाती | १२०००/- | दि. २४/०८/२०१५ ते दि.२३/०२/२०१६ |
| २१. | श्री. चव्हाण विपुल बाळासाहेब | एक्स रे टेक्निशियन . | खुला | १२०००/- | दि. ०७/०८/२०१५ ते दि.०६/०२/२०१६ |
| २२. | श्रीम. माने प्रमिला किरण | एक्स रे टेक्निशियन | अनु.जाती | १४०००/- | दि. ०७/०८/२०१५ ते दि.०६/०२/२०१६ |
| २३. | श्रीम. भानावत श्रुती सागर | फिजिओथेरपिस्ट | खुला (विजा-अ) | १२०००/- | दि. ०७/०८/२०१५ ते दि.०६/०२/२०१६ |
| २४. | श्री. खरात विश्वास रामभाऊ | पुरुष कक्ष मदतनीस | खुला (अनु.जाती) | १०३३६/- | दि. २४/०८/२०१५ ते दि.२३/०२/२०१६ |
| २५. | श्री. दगडे मिलींद विष्णू | पुरुष कक्ष मदतनीस | खुला | १०३३६/- | दि. २४/०८/२०१५ ते दि.२३/०२/२०१६ |
| २६. | श्री. सुर्यवंशी दिपक सोपान | पुरुष कक्ष मदतनीस | अनु.जाती | १०३३६/- | दि. २४/०८/२०१५ ते दि.२३/०२/२०१६ |
| २७. | श्री. मोघे विवेक भिमाजी | पुरुष कक्ष मदतनीस | अनु.जमाती | १०३३६/- | दि. २४/०८/२०१५ ते दि.२३/०२/२०१६ |

**अटी व शर्ती -**

१. मानधनावरील सेवा कालावधीत आपणांस उपस्थित दिवसांचे एकवट मानधन विहीत केलेनुसार देण्यात येईल. मनपाच्या नियमित वेतनश्रेणीतील कर्मचा-यांना लागु असणा-या इतर सुविधा, हक्क व आर्थिक लाभ मिळणार नाहीत.

२. आठवडयातुन फक्त एक दिवस रुग्णालयाच्या सोयीनुसार साप्ताहीक सुटटी राहील. मानधन कालावधीत दीड महिना काम केलेनंतर १ प्रमाणे एकुण ४ किरकोळ रजा देय राहतील व साप्ताहिक सुटटीच्या दिवशी बाहयरुग्ण विभागाचे कामकाज बंद असते त्या दिवसाची सुटटी उपभोगता येईल.

३. कामकाजाची वेळ दवाखाना/रुग्णालयाच्या वेळापत्रकानुसार व रुग्णालयीन कामकाजाचे सोयीनुसार राहील.

४. मानधनावरील पदाचे कामकाज नेमणुक देणेत आलेल्या रुग्णालयात राहील व त्यावर संबधित प्रभारी वैद्यकीय अधिकारी/नियंत्रण अधिकारी यांचे नियंत्रण राहील.

५. मानधनाचे पदावर काम करताना आपणाकडुन सर्वांना नि:पक्षपातीने वागणुक मिळणे आवश्यक आहे. कामासाठी दिलेल्या साहित्याची जबाबदारी आपणावर राहील.

६. मानधनावरील नियुक्त केलेल्या पदाचे काम सोडताना किमान एक महिना अगोदर लेखी पुर्वसुचना कार्यालयास देणे आपणावर बंधनकारक राहील.

७. आपले काम असमाधानकारक असलेस अथवा आपले सेवेची मनपास आवश्यकता नसलेस कोणतीही पुर्वसुचना न देता आपणास मानधनावरील नियुक्तीच्या पदाच्या जबाबदारीतुन कार्यमुक्त करणेत येईल.

८. एकत्रित मानधनाव्यतिरीक्त अन्य कोणतेही फायदे मिळणार नाहीत व मासिक मानधन सबंधित दवाखाना / रुग्णालयामार्फत बँक खात्यामध्ये जमा केले जाईल.

९. नियंत्रित प्रमुखांचे सुचनेनुसार आवश्यकतेप्रमाणे कामकाज करणे बंधनकारक राहील.

१०. मानधनावरील नियुक्ती म्हणजे नोकरी नाही. त्यामुळे मनपा आस्थापनेवर वेतनश्रेणीत नियुक्ती मिळावी म्हणुन निवेदन सादर करणार नाही किंवा तसा बाहय दबाव आणणार नाही. कोणत्याही न्यायालयात दावा दाखल करणार नाही याबाबत सोबत सादर केलेल्या विहित नमुन्यात (दोन साक्षीदारासह संपूर्ण नाव व पत्ता नमुद करणे आवश्यक आहे. ) हमीपत्र लिहुन द्यावे लागेल.

११. आयकर नियमाप्रमाणे मानधन रक्कमेतून TDS वजा करून अंतिम देय रक्कम अदा करणेत येईल.

१२. मनपाचे अन्य कर्मचा-यांप्रमाणे बायोमेट्रीक रजिस्ट्रेशन करणे बंधनकारक असून बायोमेट्रीक हजेरी विचारात घेऊन त्याप्रमाणे मानधन अदा केले जाईल.

१३. सदर उमेदवारांनी त्यांचे नावासमोर नमुद केलेल्या पहिल्या दिनांकापासून ते ७ दिवसाचे आत वैद्यकिय मुख्य कार्यालयात रुजू व्हावे. सदर मुदतीत रुजू होतेवेळी कागदपत्रांच्या मुळ प्रती तपासणीसाठी आणणे बंधनकारक राहील. सदर मुदतीत रूजू न झालेस तद्नंतर निवड समितीने तयार केलेल्या प्रतिक्षा यादीतील उमेदवारांना नेमणूक देणेत येईल याची नोंद घ्यावी.

**सही/-**
**(राजीव जाधव)**
**आयुक्त**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - १८.

प्रति,

**श्री / श्रीमती - <u>सर्व संबंधित उमेदवार</u>**

प्रत -

१) लेखा विभाग
२) प्रशासन विभाग
३) ----------- दवाखाना / रुग्णालय

**आरोग्य वैद्यकिय अधिकारी**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - १८.

**पिंपरी चिंचवड महानगरपालिका वैद्यकिय विभाग मुख्य कार्यालय, पिंपरी - 411 018.**

**दरमहा एकत्रित मानधनावर करारपध्दतीने, हंगामी स्वरूपावर (कॉन्ट्रॅक्टवर) काम करणा-या उमेदवारांचे नोकरीत कायम न होण्याबाबत समज तथा हमीपत्र.**

मी ---------------------------------------- पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे दवाखाना/रूग्णालयात एकत्रित मानधनावर हंगामी स्वरूपाची नियुक्ती मिळणेकामी दि- **२७/६/२०१५ व २८/६/२०१५** रोजीचे **Walk in Interview /** लेखी परीक्षेमध्ये सहभागी झालो होतो / झाले होते. मा. आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांचेकडील आदेश क्र.वैद्य/१/कावि/ /२०१५ दि. / /२०१५ अन्वये दरमहा विहित केलेल्या एकत्रित मानधनावर हंगामी स्वरूपावर (कॉन्ट्रॅक्टवरील) ------------------ या पदावरील नेमणूक आदेशातील अटी व शर्ती माझ्यावर बंधनकारक राहतील व त्या मला मान्य आहेत.

1. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे कामकाज हे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम **1949** अन्वये विनियमीत होते. या अॅक्टमधील कलम **51, 53,** व **54** अन्वये महानगरपालिका आस्थापनेवर नियमित नेमणूक मिळण्यासाठी शासन मान्य पदांची उपलब्धता विहित पध्दतीची निवड प्रक्रिया व मनपा च्या सक्षम समित्यांची मान्यता अनिवार्य आहे. या बाबींचे अनुपालन न करता तात्पुरती व तातडीची व्यवस्था म्हणून मला महापालिकेचे दवाखाना/रूग्णालयात दरमहा एकत्रित मानधनावर करारपध्दतीने हंगामी स्वरूपावर (कॉन्ट्रॅक्टवर) नेमणूक मिळालेली आहे. सदरची नियुक्ती ही सद्यस्थितीत रिक्त असणा-या पदावर व कामकाजाच्या आवश्यकतेनुसार करण्यात आलेली असल्यने भविष्यामध्ये सदरची रिक्त पदे व नव्याने मंजूर करणेत आलेली पदे नियमित वेतनश्रेणीमध्ये भरल्यानंतर माझी मानधनावरील नेमणूक संपुष्टात आणणेत येईल. हे मला पूर्णपणे समजावून देण्यात आलेले आहे व ते मला मान्य आहे.

2. वरीलप्रमाणे अनिवार्य बाबींची पुर्तता न करता माझी एकत्रित मानधनावर करारपध्दतीने हंगामी स्वरूपावर (कॉन्ट्रॅक्टवर) नेमणूक कितीही काळ चालू राहिली तरी ती नियमित होणार नाही, याची मला महाराष्ट्र शासन परिपत्रक क्र.अमाव/**2405/1215** प्रक्र **196** कावि-**26**, दिनांक : **17/4/2006** व क्र.एस.आर.व्ही **2005**/प्रक्र **47/05/12** दिनांक : **25/08/05** व मा.आयुक्त यांचेकडील परिपत्रक क्र.प्रशा/**1**/कावि/**401/06** दिनांक :**15/5/2006** अन्वये पूर्ण व स्पष्ट समज मिळालेली आहे. हे निर्णय माझेवर बंधनकारक असलेचे मला मान्य आहे.

3. मी एकत्रित मानधनावर करारपध्दतीने हंगामी स्वरूपाची (कॉन्ट्रॅक्टवरील) नेमणूक मिळण्यासाठी केलेला अर्ज महानगरपालिकेच्या सक्षम प्राधिका-यांकडून नामंजूर होऊ शकतो अथवा नेमणूक आदेश मिळाल्यास त्यात काही खंडीत कालावधी असू शकतो हे मला समजावून देण्यात आले आहे. ते मला मान्य आहे.

तरी मी एकत्रित मानधनावर करारपध्दतीने, हंगामी स्वरूपाची (कॉन्ट्रॅक्टवरील) नेमणूक कालावधीत मनपाने विहित केलेल्या नियमांचे व वेळेचे पालन करीन व मानधनावरील पुढील नेमणूकीचा आदेश न मिळाल्यास अथवा नेमणूक आदेशात काही कालावधी खंडीत असल्यास संबधित कालावधीत केलेल्या कामाचे मानधन मिळण्यासाठी तसेच मानधनावर नेमणूक आदेश मिळाल्यास नेमणुक नियमित होण्यासाठी मी महानगरपालिकेच्या कोणतयाही अधिका-यास अथवा प्राधिका-यास जबाबदार धरणार नाही. तसेच या अनुषंगाने कोणत्याही न्यायालयीन, प्रशासकीय, राजकीय, संघटनात्मक अथवा अन्य मार्गाचा अवलंब करणार नाही, अशी या हमीपत्रान्वये लेखी हमी घेत आहे.

**(श्री / श्रीमती ---------------------------------)**

**हमी लिहून देणार यांची दिनांकित स्वाक्षरी**

**साक्षीदार**

1) **स्वाक्षरी :**
**नाव :**
**पत्ता :**

2). **स्वाक्षरी :**
**नाव :**

फोटो

नाव : --------------------------------
सध्याचा पत्ता : --------------------------------
--------------------------------
मोबाईल नंबर : --------------------------------
दिनांक - / /२०१५.

प्रति,

**मा. आरोग्य वैद्यकीय अधिकारी**
पिंपरी चिंचवंड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

**विषय : ----------------- या मानधनाचे पदावर रूजू अहवाल.**

**महोदय,**

मा.आयुक्त यांचेकडील आदेश क्र.वैद्य/०१/कावि/ /२०१५ दि. / /२०१५ अन्वये माझी ------------------ या मानधनाचे पदावर **६ महिने कालावधीकरीता** नेमणुक झालेली आहे. नेमणुक आदेशातील नमूद केलेल्या सर्व अटी व शर्ती मला मान्य आहेत.

तरी मी आज दि. / /२०१५ रोजी मध्यान्हपुर्व/मध्यान्होनंतर मला नियुक्ती दिलेल्या मानधनाचे पदावर रूजु होत आहे. तरी मला रूजू करून घ्यावे ही नम्र विनंती.

**कळावे,**

**आपला विश्वासू**

**सही-**
**नाव :------------------------------**

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी -१८.
वैद्यकीय विभाग मुख्य कार्यालय
क्र. वैद्य/०१/कावि/ /२०१५.
दि. / /२०१५.

**प्रति,**

**प्रभारी /ज्येष्ठ वैद्यकिय अधिकारी**
--------------- दवाखाना / रुग्णालय

२/- श्री/श्रीम.-------------------------------------------- हे / हया संदर्भिय रूजु अहवालाप्रमाणे वैद्यकीय मुख्य कार्यालयात दि. / /२०१५ रोजी मध्यान्हपुर्व / मध्यान्हनंतर हजर झाले आहेत. त्यांचा रूजू रिपोर्ट घेणेत आला असुन कामकाजासाठी आपले रूग्णालयात नेमणुक देणेत येत आहे. आदेशात नमूद केलेप्रमाणे एकत्रित मानधन आपले रूग्णालयातुन अदा करणेत यावे.

**आरोग्य वैद्यकीय अधिकारी**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - १८.